लोकमत

# परीक्षा मंडळ संचालक पदाच्या नियुक्तीची प्रक्रिया नव्याने होणार

## शिवाजी विद्यापीठ : व्यवस्थापन परिषदेची मान्यता


लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक, विविध चार विद्याशाखांचे अधिष्ठाता, क्रीडा विभागाचे संचालक, आदी संविधानिक पदांच्या नियुक्तीची प्रक्रिया नव्याने राबविण्यास व्यवस्थापन परिषदेने बुधवारी मान्यता दिली. या परिषदेची बैठक ऑनलाईन झाली.

परीक्षा मंडळ, क्रीडा विभाग, इन्क्युबेशन सेंटर आणि मानव्यविद्या, विज्ञान व तंत्रज्ञान, आदी संविधानिक पदांच्या नियुक्तीची प्रक्रिया गेल्या दीड वर्षापासून रखडली आहे. या पदांच्या नियुक्तीची प्रक्रिया नव्याने राबविण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. त्यातील परीक्षा मंडळ संचालक पदासाठी यापूर्वी झालेल्या प्रक्रियेतील मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना नव्याने अर्ज करावा लागणार आहे. राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी), क्रीडा आणि सांस्कृतिक विभागातील विद्यार्थ्यांना ग्रेस गुण देण्याबाबतचा प्रस्ताव कुलपती कार्यालयाला सादर करण्याची शिफारस या परिषदेने केली असल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली. दरम्यान, विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील विविध २६ अभ्यासक्रमांची परीक्षा बुधवारी झाली.

### कोविड सेंटरबाबत प्रशासनाकडे मागणी

विद्यापीठातील अधिकारी आणि अधिविभाग, संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांना कोरोनाच्या पार्श्वभूमीवर उपचारांची गरज भासल्यास विद्यापीठातील कोविड सेंटरमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत महानगरपालिकेचे उपायुक्त रविकांत आडसूळ यांच्याशी चर्चा करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनालादेखील पत्र पाठविण्यात येणार असल्याची माहिती डॉ. नांदवडेकर यांनी दिली.



### कुलसचिव नियुक्तीबाबतही मान्यता

विद्यमान कुलसचिवांचा कार्यकाळ नोव्हेंबरमध्ये पूर्ण होणार आहे. त्यापूर्वी पुढील कार्यकाळासाठी या पदाच्या नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण व्हावी, या उद्देशाने व्यवस्थापन परिषदेने या पदाची नियुक्ती प्रक्रिया राबविण्यास मान्यता दिली.

2 9 APR 2021 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात ११५ पक्ष्यांचा आढळ

## पक्ष्यांच्या नोंदीवर आधारित पुस्तक प्रकाशित

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** हिरवाईची गर्द छाया असलेल्या शिवाजी विद्यापीठात पक्ष्यांचाही मुक्त वावर आहे. एका संशोधनानुसार विद्यापीठात सर्वसाधारण व दुर्मीळ अशा सर्व प्रकारचे मिळून सुमारे ११५ पक्ष्यांची नोंद झाली आहे. त्यातून प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. एस.एम. गायकवाड यांचे 'बर्ड्स ऑन शिवाजी युनिव्हर्सिटी कॅम्पस' हे ११८ पानी कॉफिटेबल बुक गुरुवारी साकारले आहे.

शिवाजी विद्यापीठाने गेल्या काही वर्षांत शिक्षक, संशोधक, विद्यार्थी यांना संशोधनासाठी संशोधन योजना जाहीर केल्या आहेत. त्याअंतर्गत विद्यापीठाच्या ८५३ एकर परिसरात डॉ. गायकवाड यांनी गेल्या दोन वर्षांमध्ये सातत्याने पक्षीनिरीक्षण केले. विशेषतः करोना टाळेबंदीत विद्यापीठ परिसरात मनुष्य हस्तक्षेप अत्यल्प होता. त्याचा लाभ घेऊन निर्भयपणे मुक्त विहार करणाऱ्या पक्ष्यांचे निरीक्षण, छायाचित्रे टिपणे या गोष्टी त्यांना चांगल्या प्रकारे करता आल्या. त्यातून त्यांनी ११५ पक्षी असल्याचे नोंदविले आहे.




### सुरक्षित अधिवास

शिवाजी विद्यापीठाचा परिसर हा निसर्गरम्य आहेच, खेरीज नानाविध पशुपक्ष्यांसाठी सुरक्षित अधिवास असल्याचे डॉ. गायकवाड यांच्या संशोधनातून सिद्ध झाले आहे, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.




डॉ. एस. एम. गायकवाड यांनी शिवाजी विद्यापीठ परिसरात टिपलेले पक्ष्याचे छायाचित्र.

### सचित्र माहिती फलक

विद्यापीठात जेथे जे पक्षी आढळले, तेथे संबंधित पक्ष्याचा सचित्र माहिती फलकही उभारण्यात आला आहे. परिसरात फिरावयास येणाऱ्या नागरिकांनाही त्या परिसरातील कोणत्या पक्षाचा आढळ होऊ शकतो, याचा अदमास येण्यास मदत होते. याबाबत डॉ. गायकवाड म्हणाले, विद्यापीठाने प्रोत्साहन निधी दिल्यामुळे हे संशोधन झाले. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, विभागप्रमुख डॉ. व्ही.एस. मन्ने यांच्या सहकार्यामुळे कॉफीटेबल बुक प्रकाशित झाले. त्यामध्ये पक्ष्यांचे छायाचित्र, थोडक्यात माहिती आणि जिज्ञासूंना अधिक माहिती प्राप्त करण्यासाठी प्रत्येक पक्ष्याच्या पृष्ठावर एक 'क्यूआर' कोड छापला आहे. त्याद्वारे त्या पक्ष्याची सविस्तर माहिती मोबाइलवर दिसेल.

# ऑनलाईन परीक्षेला २० हजार विद्यार्थी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ परीक्षेंतर्गत बुधवारी विविध अभ्यासक्रमांच्या झालेल्या ऑनलाईन परीक्षेला २० हजार ७२८ पैकी २० हजार ३८२ विद्यार्थी बसले. बीएस्सी.-बायोटेक, बीएस्सी.-शुगरटेक, बीबीए, बीएसडब्ल्यू., बीआयडी, बीएफटीएफ, बी.व्होक., बीडीएस, बी.एस्सी.-संगणकशास्त्र, एम.लिब. आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत झाल्या.

29 APR 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यापीठांतर्गत परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मंगळवारी झालेल्या पदवी व पदव्युत्तरच्या ऑनलाईन परीक्षा सुरळीत पार पडल्या. या परीक्षेसाठी २०७२८ विद्यार्थ्यांनी अर्ज भरला होता. त्यापैकी २०१३८२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

यामध्ये बी. एस्सी–बायोटेक, बी. एस्सी. आयटी, बी. एस्सी. शुगर टेक, बी. एस्सी. फुड प्रोसेसिंग ॲन्ड पॅक, बी. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, बी. एस्सी., बी. बी. ए., बी. सी. ए., बी. एस्स. डब्ल्यू., बी. आय. डी., बी. डी. एफ. सी., बी. एफ. टी. एम., बी. होक., एम. ए., बी. डी. एस., एम. लिप., एम. एस. डब्ल्यू., एम. कॉम., मास्टर ऑफ व्हॅल्युएशन, एम. सी. ए., एम. एस्सी. नॉनो सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी, एम. ए./ एम. एस्सी. भुगोल, एम. एस्सी., बी. एस्सी., बी. ए. या अभ्यासक्रमाचा समावेश आहे.

# शिवाजी विद्यापीठातील खेळाडूंना मिळणार ग्रेस गुण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील खेळाडूंना ग्रेस गुण द्या, या मागणीसाठी गतवर्षी अधिसभेत एकमताने मान्यता देण्यात आली होती. अनेक संघटनांनी निवेदनेही दिली तरीही गेल्या पाच वर्षापासून ग्रेस गुण देण्याचा निर्णय होत नव्हता. विद्यापीठाच्या वतीने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या क्रीडा, सांस्कृतिक आणि एनएसएसच्या विद्यार्थ्यांना ग्रेस गुण देण्याचा निर्णय झाला. याचा लाभ विद्यापीठ अंतर्गत जवळपास ३ हजार विद्यार्थ्यांना होणार आहे. हा निर्णय बुधवारी झालेल्या विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के तर सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.



तरुण भारत
इफेक्ट

विद्यापीठातील खेळाडूना ग्रेस गुण मिळावे ही मागणी सातत्याने पुढे येत होती. गेल्या पाच वर्षापासून 'तरुण भारत'ने हा विषय उचलून धरला होता. बुधवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेत ग्रेस गुण देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे विद्यापीठ खेळाडूंसह मागणी करणाऱ्या अधिसभा सदस्य आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस क्रीडा सेल यासह अन्य संघटनांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

- व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय

### संविधानिक भरतीस मान्यता

बुधवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेत परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक, संशोधन व नवोपक्रम मंडळ संचालक, चार अधिष्ठाता ही पदे नव्याने जाहीरात काढून भरण्याचा निर्णय घेतला आहे. काही पदांसाठी पुर्वी काढलेली जाहीरात काढून सुरू असलेली पदभरतीची प्रक्रिया रद्द केली आहे.

### पाच वर्षापुर्वीपासूनची मागणी मंजूर

विद्यार्थ्यांना ग्रेस गुण द्या यासाठी पाच वर्षापासून राष्ट्रवादी कॉंग्रेस क्रीडा सेलचा लढा सुरू होता. ग्रेस गुण देण्यास मंजूरी दिल्याने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अधिसभा सदस्य भैया माने यांच्यासह माझ्याबरोबर असलेले राष्ट्रवादीचे नेते, सहकाऱ्यांचे आभार.

– सुहास साळोखे (अध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस क्रीडा सेल)

### क्रीडा पातळी क्रीडा

| क्रीडा पातळी | क्रीडा | ♦ | ♦ | ♦ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ♦ | ♦ | – | – | प्रथम क्रमांक – | द्वितीय क्रमांक – | तृतीय क्रमांक – | सहभाग २० |
| – | – | | ♦ | २० | १८ | १६ | १६ |
| नॅशनल | नॅशनल लेव्हल इंटर ♦ | ♦ | नॅशनल लेव्हल इंटर ♦ | १६ | १४ | १३ | ११ |
| स्टेट | स्टेट लेव्हल इंटर ♦ | ♦ | स्टेट लेव्हल इंटर ♦ | १४ | १३ | ११ | १० |
| डिस्ट्रीक्ट | इंटर झोनल गेम | एटीसी ♦ | डिस्ट्रीक लेव्हल युथ ♦ | १२ | ११ | १० | - |

# ‘विद्यापीठ कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र बेडस् ठेवा’

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी विद्यापीठातील कोविड सेंटरमध्ये स्वतंत्र बेडस् राखीव ठेवावे, याबाबत विद्यापीठ प्रशासनाकडून गुरुवारी जिल्हाधिकारी दौलत देसाई यांना पत्र पाठविण्यात येणार आहे. विद्यापीठ प्रशासनाकडे विद्यापीठ, महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना कोविड केअर सेंटरमध्ये बेडस् ठेवावे, अशी मागणी होत आहे. यापार्श्वभूमीवर विद्यापीठाने जिल्हा प्रशासनास पत्रव्यवहार करणार आहे. यामुळे विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयातील सुमारे दहा हजारांहून अधिक जणांना याचा फायदा होईल.

लोकसत्ता

# शिक्षणशास्त्र अधिविभागाला सव्वा कोटीचे अर्थसाह्य

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** एका आंतरराष्ट्रीय प्रकल्पांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागाला १ कोटी २० लाख रुपयांचे अर्थसाह्य प्राप्त झाले आहे.

शिक्षणशास्त्र अधिविभाग 'युरोपियन युनियन'च्या 'इरॅस्मस प्लस' अर्थसहाय्यित प्रकल्पामध्ये काम करीत आहे. या मध्ये इटली, लेविटिया, फिनलंड, जर्मनी या देशांतील विद्यापीठे भागीदार आहेत. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षक प्रशिक्षक व सेवांतर्गत शिक्षकांमध्ये एकविसाव्या शतकातील कौशल्ये विकसित करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. हा प्रकल्प तीन वर्षांमध्ये पूर्ण करण्यात येईल. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांचे प्रकल्पासाठी सहकार्य लाभत आहे, ही माहिती प्रकल्प समन्वयक डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी येथे दिली.


सकाळ

# संविधानिक पदे भरतीचा प्रस्ताव

## व्यवस्थापन परिषदेचा निर्णय : राज्यपालांच्या मंजुरीनंतर प्रक्रिया

कोल्हापूर, ता. २८ : विद्यापीठातील संविधानिक पदे भरण्याची शिक्षण संचालनालयाने परवानगी दिली आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठातील रिक्त संविधानिक पदांचा प्रस्ताव राज्यपाल कार्यालयाकडे पाठवण्यात आला आहे. तेथून परवानगी मिळाल्यावर पदे भरण्याची प्रक्रिया सुरू होईल. प्रस्ताव पाठवण्याचा निर्णय आज झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. या शिवाय ग्रेस गुणांचा प्रस्तावही राज्यपाल कार्यालयाकडे पाठवण्यात येणार आहे.

विद्यापीठातील क्रीडा संचालक, परीक्षा नियंत्रक, इन्क्युबेशन सेंटर संचालक, चार अधिष्ठाता ही पदे रिक्त आहेत. पदे भरण्यास शिक्षण संचालनालयाने परवानगी दिली असून याबाबताचा प्रस्ताव राज्यपाल



कार्यालयाकडे पाठवण्यात येणार आहे. तेथून आल्यावर ही पदभरतीची प्रक्रिया सुरू होईल.

परीक्षा नियंत्रक पदासाठी अर्ज मागवण्यात आले होते. त्यांची छाननी होईल, मुलाखतींना बोलवण्यात येणाऱ्या उमेदवारांची यादीही बनवण्यात आली होती. मात्र ही प्रक्रिया आता पहिल्यापासून पुन्हा राबवावी लागणार आहे. या शिवाय एन. सी. सी., एन. एस. एस. या विद्यार्थ्यांनाही ग्रेस गुण देण्याचा प्रस्ताव राज्यपाल कार्यालयाकडे पाठवण्यात येणार आहे. विद्यापीठ कर्मचाऱ्यांसाठी विद्यापीठातील कोरोना सेंटरमधील काही बेड राखीव असावेत याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवण्यात येणार आहे. याबाबतचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

**कुलसचिव पदाची नेमणूक प्रक्रिया सुरू होणार**

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची मुदत सहा महिन्यांनी संपणार आहे. त्यांची मुदत संपण्याच्या आधी नवीन कुलसचिव नियुक्त व्हावेत, यासाठी पुढील काही दिवसांनी ही प्रक्रिया सुरू करावी. असा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

Kolhapur, Main
29/04/2021 Page No. 7

# एनसीसी, क्रीडा, सांस्कृतिकमधील

# विद्यार्थांना ग्रेस गुण मिळणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयातील एनसीसी, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना ग्रेस गुण देण्याबाबतच्या प्रस्ताव बुधवारी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. लवकरच हा प्रस्ताव राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे शिफारसीसाठी पाठविला जाणार आहे.

विद्यापीठ व्यवस्थापन परिषद बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सदस्य सचिव म्हणून कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी काम पाहिले. बैठकीत विविध विषयांवर चर्चा झाली. विद्यार्थ्यांना ग्रेस गुण देण्याबाबत निर्णय गेल्या दोन वर्षांपासून कामकाज सुरू होते. नियुक्त समितीने हे काम पूर्ण करून अहवाल व्यवस्थापन परिषदेस सादर केला. त्यानुसार बैठकीत प्रस्तावास मान्यता देण्यात आली. विद्यापीठातील सांविधानिक पदे राज्य शासनाच्या सूचनेप्रमाणे भरण्यास व्यवस्थापन परिषदेत मान्यता देण्यात आली.

सकाळ



मुख्य इमारतीसमोरील बागेत सुशोभीकरणाचे काम सुरू आहे.

# शिवाजी विद्यापीठातील बागेचे सुशोभीकरण सुरू

सकाळ वृत्तसेवा

आर. के. नगर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठातील मुख्य इमारतीसमोरील बागेच्या सुशोभीकरणाच्या कामाला प्रारंभ झाला आहे. लँडस्केप गार्डन, दगडी रेलिंग, विद्युत रोषणाई ही कामे सुशोभीकरणांतर्गत होणार आहेत. पावसाळ्यापूर्वी हे सुशोभीकरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

मुख्य इमारतीसमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आहे. हा पुतळा विद्यापीठाची प्रतीकात्मक ओळख आहे. या पुतळ्याच्या भोवती असणाऱ्या उद्यानालाही वेगळे महत्त्व आहे. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांनी या बागेची उभारणी विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून केली होती.

विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षान्त समारंभापासून या बागेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर उभे राहून पदवीधर झालेले तरुण-तरुणी छायाचित्र काढतात. या बागेतील आकर्षक फुलांमुळे विद्यापीठ परिसराचे सौंदर्य खुलले आहे; मात्र काही वर्षांपासून उद्यानाच्या नूतनीकरणाची चर्चा सुरू होती. त्यासाठी विद्यापीठाच्या अंदाजपत्रकात तरतूदही केली. सुशोभीकरणाच्या दुसऱ्या टप्प्याला आता सुरुवात झाली आहे. पहिल्या टप्प्यात उद्यानाच्या चारही बाजूंनी पुतळ्यापर्यंत जाणारा मार्ग प्रशस्त केला आहे. यामुळे पुतळा धुण्यासाठी आता वॉटरगन असणारा टँकर पुतळ्याच्या जवळ जाऊ शकतो.

या मार्गाच्या बाजूला घडवलेले दगड लावले आहेत. आता सुशोभीकरणाच्या पुढच्या टप्प्याला सुरुवात झाली आहे. यामध्ये उद्यानाच्या कडेला बेसाल्ट खडकाचे रेलिंग केले जाणार आहे. त्याचबरोबर बागेमध्ये स्प्रिंकलर बसवण्यात येणार आहेत. तसेच येथे लँडस्केप गार्डनही केले जाणार आहे. विविध प्रकारची आकर्षक फुलझाडे लावून उद्यानाची आकर्षता वाढवण्यात येणार आहे. तसेच उद्यानात आकर्षक पण सौम्य विद्युत रोषणाईही केली जाणार आहे. पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण करण्याचा विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागाचा प्रयत्न आहे.